म. रा. मा. व उ. मा. शिक्षण मंडळ
पुणे - ४११ ००५.
12 MAY 2005
आवक क्रमांक २८
शाखा

**अनधिकृत शाळेमध्ये इयत्ता १० वी व १२ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी खाजगी विद्यार्थी - थेट अर्ज योजनेचा लाभ घेण्याबाबत**

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक- एसएससी २००५/(११/०५)/उमाशि-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २ मे, २००५

वाचा : १) शासन पत्र क्र.एसएससी-२००२/२३१/०२/उमाशि-२. दिनांक ४ ऑगस्ट. २००२.
२) सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्चमाध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे क्र.रामं/परीक्षा-३/७४६. दिनांक ३०जानेवारी. २००३ चे पत्र.
३) शासन पत्र क्र.एसएससी-२००२/२३१/०२/उमाशि-२. दिनांक १५ मार्च. २००३.

**शासन परिपत्रक :** राज्यात अनधिकृतपणे सुरु असणाऱ्या सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय बंद करण्याविषयी व सर्व संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या सूचना शासन परिपत्रक क्रमांक संकीर्ण-१००३/(२५१/०३)/माशि-१. दिनांक १९ एप्रिल. २००३ अन्वये व क्रमांक नमाशा १००४/(१७२/०४)/माशि-१. दिनांक ३१ जानेवारी, २००५ अन्वये देण्यात आलेल्या आहेत. तसेच या अनधिकृत शाळांची यादी दरवर्षी शाळा प्रवेशाच्यावेळी वृत्तपत्रात प्रसिद्ध करण्याविषयी देखील संबंधितांना सूचित करण्यत आले आहे. तथापि, अशा शाळांमध्ये जर इयत्ता १० वी चे वर्ग सुरु असतील, तर त्या विद्यार्थ्यांना खाजगी विद्यार्थी म्हणून थेट योजनेंतर्गत फॉर्म नं. १७ भरुन राज्यमंडळाच्या इयत्ता १० वी च्या परीक्षेस बसविण्यात यावे. थेट अर्ज योजनेद्वारे प्रतिकूल परिस्थितीत तसेच आर्थिक, सामाजिक किंवा अन्य कारणांनी इयत्ता १० वी पर्यंतचे शिक्षण नियमित शाळेमध्ये जाऊन पूर्ण न करु शकलेल्या परंतु, इयत्ता ४ थी उत्तीर्ण व वय वर्ष १४ पूर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी च्या मार्च मध्ये होणाऱ्या परीक्षेस प्रविष्ठ होता येते. अनधिकृतरित्या चालणाऱ्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांचा कोणताही दोष नसतांनाही इयत्ता १० वी च्या परीक्षेला केवळ ते नियमित विद्यार्थी नसल्याने वंचित रहाण्याची वेळ येते व पर्यायाने त्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाते. राज्यात यावर्षी मार्च-२००५ मध्ये झालेल्या परीक्षेत ब-याच

अनधिकृत शाळेतील विद्यार्थी इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षेला बसू शकले नाहीत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ न देणे ही जबाबदारी सर्वप्रथम संस्था चालकांची आहे हे विचारात घेता संस्था चालकांनी व मुख्याध्यापकांनी शाळेस मान्यता नसेल व इयत्ता १० वी व १२ वी चे वर्ग सुरु असतील तर, प्रथम विहित मुदतीत म्हणजेच दिनांक ५ ऑगस्ट पर्यंत खाजगी विद्यार्थी म्हणून विद्यार्थ्यांची नावे नोंदणी करावी जेणे करुन एकही विद्यार्थी इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षेपासून वंचित रहाणार नाही. थेट अर्ज योजनेस वृत्तपत्रातून व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. तसेच परीक्षेच्या निकालाच्यावेळेस या योजनेची माहिती सर्व संबंधितांना द्यावी. शाळांनी देखील ज्यांचे शिक्षण अर्धवट राहीले आहे, अशा माजी विद्यार्थ्यांना या योजनेची माहिती द्यावी. तसेच या योजनेस जाहिर प्रसिद्धी मिळण्यासाठी योजनेची माहिती शाळेच्या सूचना फलकावर नियमितरित्या लावावी अशा सूचना सर्व शाळांना देण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सुवर्णा सि.खरात)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,शिवाजीनगर, पुणे ४११ ०१०
सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,शिवाजीनगर, पुणे ४११ ०१०
(यांनी सदर योजनेस व्यापक प्रसिद्धी द्यावी.)
विभागीय अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई/पुणे/ नाशिक/नागपूर/ कोल्हापूर/अमरावती/औरंगाबाद/लातूर विभागीय मंडळ.
विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई/पुणे/ नाशिक/नागपूर/ कोल्हापूर/अमरावती/औरंगाबाद/लातूर विभागीय मंडळ.
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्चमाध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
सर्व शिक्षणाधिकारी( माध्यमिक) जिल्हा परिषद.
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
निवड नस्ती (उमाशि-२)

D:\...\HSC-2 THET YOJANA